Impact Factor 8.379

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-XII ISSUE-IX SEPT 2025

Address
- Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR - DR.PRAMOD P. TANDALE

VOL- XII ISSUE- IX SEPTEMBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x


| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Pradip D. Garole | Moral-Ethical Compass (MEC): Guiding From Personal Morality to Global Ethical Responsibility | 1 To 4 |
| 2 | Gagandeep Kaur | Human-Centered Pedagogy in the AI Era: Teachers as Designers of Ethical and Creative Learning | 5 To 7 |
| 3 | Shiksha | Reimagining the Divine: Mythical Paradigms in Amish Tripathi's Shiva Trilogy | 8 To 13 |
| 4 | Prof. Digvijay Dnyaneshwar Ubale | Awareness of Wildlife Conservation among Students | 14 To 17 |
| 5 | Alok Gude & Rajendra D. Shinde | Biodiversity-Driven Hydrological Services of Tansa Wildlife Sanctuary | 18 To 24 |
| 6 | Dr. Bharat Bhopu Rathod | Role of Panchayati Raj Institutions in Local Governance | 25 To 28 |
| 7 | Prof.Dr. Nanu Gangaram Chavan | Impact of Environmental Pollution on Plant Growth | 29 To 32 |
| 8 | Dr. Mahendra B. Bagul | Comparative Analysis of Potato Production, Productivity and Area Cultivation: India and Major Potato-Producing Countries | 33 To 41 |
| 9 | Mr. Kiran Mukund Yewale & Dr. Sanjay Ankush Kale | CAG and Political Accountability: A Critical Assessment of its Impact on Policy Making in India | 42 To 44 |
| 10 | Pradip Garole | From Policy to Practice: Implementing Competency-Based Education under NEP 2020 for Equity, Inclusion, and Excellence | 45 To 50 |

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 11 | Dr. Zunjarrao S. Kadam | A Psychological Understanding the Shifting Mentality and Increasing Stress of Unemployed Youth in Rural Areas | 51 To 54 |
| 12 | Dr. Sarika S.Jadhav & Dr. Anjali Hingane & Dr. Smita Dhurde | Literary Review of Mantra Chikitsa | 55 To 59 |
| 13 | डॉ. जिया लाल राठौर | महिला सशक्तिकरण: ग्रामीण, जनजातीय और संपोषणीय विकास : एक अध्ययन | 60 To 63 |
| 14 | ikpk;] Mk- ओमप्रकाश cUlhyky >oj | विकलांगता एक शाप | 64 To 66 |
| 15 | प्रा. डॉ. संतोष सुभाषराव कुलकर्णी | हिमांशु जोशी की कहानियों में अभिव्यक्त स्त्री | 67 To 70 |
| 16 | विनायक लक्ष्मण कांबळे | सांगली जिल्हयातील ऐतिहासिक पर्यटनाच्या संधी | 71 To 74 |
| 17 | प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर | मनरेगा ग्रामीण उपजीविकेचे साधन: एक संशोधनात्मक अभ्यास-विशेष संदर्भ लातूर जिल्हा | 75 To 82 |
| 18 | श्रीमती.आंम्रपाली स्वामीराव चंदनशिवे<br>डॉ. सय्यद रशीद जिलानी | महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांचा वाढता सहभाग : एक अभ्यास | 83 To 86 |
| 19 | डॉ. एम.व्ही.मते<br>श्रीमती. गोडसे प्राजक्ता आबासाहेब | भूगोल विषय अध्यापनात YouTube या समाजमाध्यमाच्या परिणामकरकतेचा चिकित्सक अभ्यास | 87 To 91 |
| 20 | डॉ. अमोल सुभाष कवडे | श्रम आणि समतेचा स्वर - संत जनाबाईच्या साहित्यातील सामाजिक क्रांतीचे बीज | 92 To 94 |

# श्रम आणि समतेचा स्वर - संत जनाबाईंच्या साहित्यातील सामाजिक क्रांतीचे बीज

**डॉ. अमोल सुभाष कवडे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य आणि संस्कृतीचा आधारस्तंभ म्हणजे संत साहित्य. विशेषतः बाराव्या शतकापासून महाराष्ट्रात भक्तीच्या माध्यमातून जी सामाजिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली, ती वारकरी संप्रदायाच्या रूपाने आजही प्रवाहित आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या प्रमुख संतांच्या बरोबरीने स्त्री संतांची परंपराही येथे लक्षणीय आहे. मुक्ताबाई, सोयराबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, जनाबाई या संत कवयित्रींनी या परंपरेला समृद्ध केले. या परंपरेत अत्यंत खालच्या सामाजिक स्तरातील आणि उपेक्षित जीवन जगलेल्या संत जनाबाई यांचे स्थान अनमोल आहे. भारतीय समाजात, विशेषतः पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये, स्त्रीला शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्थान यांपासून वंचित ठेवण्यात आले. अशा प्रतिकूल परिस्थितीत एका शूद्र कुटुंबात जन्मलेल्या आणि आयुष्यभर दासी म्हणून राहिलेल्या स्त्रीने उच्च कोटीचे अध्यात्मिक आणि सामाजिक भान असलेले काव्य निर्माण करणे, ही केवळ एक साहित्यिक घटना नसून ती एक सामाजिक क्रांती होती. जनाबाईंनी आपल्या साहित्यातून केवळ विठ्ठल भक्तीचा गहिवर व्यक्त केला नाही, तर दैनंदिन श्रम, जातीय विषमता, आणि स्त्री जीवनातील दुःख यांनाही वाचा फोडली.

**संत जनाबाई — जीवनपरिचय**

संत जनाबाईंचा जन्म इ.स. १२७१ मध्ये मराठवाड्यातील गंगाखेड, जिल्हा परभणी येथे एका शूद्र कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव कुरुंड आणि वडिलांचे नाव दमा होते. संत चरित्रकार महिपती बोवा ताहाराबादकर यांच्या 'भक्ती विजय' या ग्रंथातून जनाबाईंच्या जीवनाची माहिती मिळते. जन्मानंतर आईचे निधन झाले आणि वडील त्यांना पंढरपूरला घेऊन आले आणि पंढरपूरचे महान संत नामदेव यांच्या कुटुंबाची सेवा करण्यासाठी दामाजीशेटी (नामदेवांचे वडील) यांच्याकडे सुपूर्द केले. आईच्या निधनानंतर कालांतराने वडिलांचेही निधन झाले. त्यानंतर मात्र त्या खऱ्या अर्थाने अनाथ आणि पोरक्या झाल्या. या अनाथपणाच्या जाणिवेतूनच त्यांची विठ्ठलाप्रतीची आर्तता वाढली, त्यावेळी त्या म्हणतात,

*"आई मेली बाप मेला।*
*मज सांभाळी विठ्ठला।।"*

ही विनवणी अनाथपणाच्या जाणीवेतून आलेली आहे. यामुळे त्यांची भक्ती केवळ अध्यात्मिक ओढ नसून, ती त्यांच्या अनाथपणाची आणि एकटेपणाची भावनात्मक गरज बनली होती. यानंतरचे त्याचे संपूर्ण आयुष्य नामदेवांच्या घरी दासी म्हणून गेले.

**नामदेवांचे कुटुंब आणि उपेक्षित जीवन**

जनाबाई नामदेवांच्या घरी आयुष्यभर दासी म्हणून राहिल्या. नामदेवांच्या कुटुंबात आई गोणाई, वडील दामाशेटी, नामदेव, पत्नी राजाई, चार पुत्र, सुना, बहीण, मुलगी अशा सुमारे १४ व्यक्ती होत्या. जनाबाई त्या कुटुंबातील पंधराव्या सदस्य होत्या, पण केवळ दासी म्हणून. जनाबाई नामदेवांच्या घरी पाणी आणणे, धान्य दळणे, भाकरी करणे, झाडून काढणे इत्यादी सर्व कामे करत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्यांना नामदेवांची दासी असल्याचा त्यांना कमीपणा वाटला नाही, उलट त्या अभिमानाने स्वतःला 'नामयाची दासी' म्हणवून घेत असत.

जनाबाईंचा जीवनप्रवास हा संघर्षमय होता. दासी असल्याने समाजात त्यांना मानसन्मान नव्हता. दारिद्र्यामुळे आणि शूद्र असल्यामुळे त्यांना मंदिराच्या आत प्रवेश मिळत नव्हता शूद्र जातीत जन्माला आल्याने त्यांना दुजाभावाची वागणूक दिली गेली. नामदेव स्वतः उत्कट विठ्ठलभक्त आणि संत असल्याने त्यांच्या सहवासाने जनाबाईंच्या जीवनात परिवर्तन घडत गेले. पुढे त्यांनी नामदेवांना आपले गुरु मानले.

**संत जनाबाई यांचे अभंगविश्व**

संत जनाबाईं यांच्या नावावर सुमारे ३४८ ते ३५० अभंग उपलब्ध असून. हे अभंग म्हणजे केवळ भक्तीगीते नाहीत, तर स्त्री जीवनाचा, श्रम संस्कृतीचा आणि तत्कालीन समाजाचा इतिहास सांगणारे ते महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आहेत. त्यांच्या अभंगांमध्ये काव्यात्मकता आणि कथात्मकता अनेकदा एकत्रितपणे दिसून येते.

**विठ्ठल-भक्ती आणि श्रम-संस्कृती**

जनाबाईंची भक्ती ही त्यांच्या दैनंदिन श्रमांशी जोडलेली आहे. त्यांच्या अभंगांमधून धान्य दळणे, झाडणे, पाणी भरणे, भाकरी करणे यांसारखी कामे येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या श्रमाच्या कामांमध्ये त्यांना स्वतः विठ्ठल पांडुरंग मदत करतो, असे त्या म्हणतात.

*झाडं लोट करी जनी! केर भरी चक्रपाणी!! १!!*
*पाटी घेऊन या शिरी !नेऊनिया टाकी दुरी!! २!!*
*ऐसा भक्तिसी भुलला! नीच कामे करू लागला!! ३!!*
*जनी म्हणे विठोबाला काय उतराई होऊ तुला!!४!!*

अशाप्रकारे त्यांनी आपल्या अभंगातून श्रमाला भक्तीचे रूप दिले आहे. त्यांनी श्रमाचे उदात्तीकरण न करता श्रमाधिष्ठित जीवनाचे महत्व अधोरेखित करून, एकप्रकारे हा श्रम-संस्कृतीचा इतिहास आपल्यासमोर ठेवला आहे.

**स्त्री-सक्षमीकरणाचा संदेश**

संत जनाबाई यांचे साहित्य आज महिला सक्षमीकरणाच्या संदर्भातदेखील अत्यंत मोलाचे आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्त्रियांनाआशावादी संदेश दिला आहे, त्या म्हणतात..

*स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास!*
*साधुसंता ऐसे केले जनी!! १!!*
*संतांचे घरची दासी मी अंकिली !*
*विठोबाने दिली प्रेम कळा!!२!!*

त्यांनी स्त्रियांच्या श्रमाला अध्यात्माची जोड देऊन त्यांचे महत्त्व वाढवले. दासीपण, दारिद्र्य आणि उपेक्षा यांचा अनुभव असूनही त्यांनी स्त्रीचा जन्म असला तरी स्वतःला कमी लेखू नका असा त्यांनी उपदेश केला आहे. 'दासी' या हीन समजल्या जाणाऱ्या ओळखीला त्यांनी 'नामयाची दासी' या अभिमानास्पद बिरुदात रूपांतरित केले. संतांच्या घरची दासी असल्याने विठ्ठलाच्या प्रेमाचा अनुभव मिळाला, यात त्या धन्यता मानतात. यामुळे त्यांच्या साहित्यात स्त्री-सक्षमीकरण आणि आत्मगौरवाचा एक सूक्ष्म प्रवाह दिसतो.

**जातीय विषमतेवर प्रखर टीका**

जनाबाईंच्या काळात जातिव्यवस्था ही एक मोठी सामाजिक समस्या होती. जनाबाईंना आयुष्यभर जातीय भेदभावाचा सामना करावा लागला. शूद्र असल्यामुळे त्यांना या विषम व्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव आला. मंदिरात प्रवेश न मिळणे, शूद्र असल्यामुळे कनिष्ठ मानले जाणे, ही त्यांच्या जीवनाची दाहक सत्ये होती. नामदेवांचे कुटुंबीय मंदिरात जात असताना त्यांना बाहेर उभे राहावे लागत असे. या विषमतेवर त्यांनी अत्यंत प्रांजळपणे भाष्य केले आहे.

*राजाई गोणाई। अखंडित तुझे पायी।*
*मज ठेविले द्वारी। नीच म्हणुनी बाहेरी।*
*नारागोंदा महादा विठा। ठेविले अग्रवाटा।*

हे दुःख केवळ एकट्या जनाबाई यांचा नसून, तत्कालीन समाजरचनेवर त्यांनी केलेले भाष्य आहे. त्यांना विठ्ठलाने साक्षात दर्शन दिले, पण उच्चवर्णीय भक्तांनी मात्र त्यांची दखल घेतली नाही किंवा त्यांच्या साक्षात्कारावर हसले, हेही वास्तव त्यांनी मांडले आहे. यातून त्यांचा समानतावादी आणि वास्तववादी दृष्टिकोन दिसून येतो.

**विद्रोही स्वर आणि परमेश्वराशी संवाद**

जनाबाईंचा विठ्ठलाला थेट शिव्याशाप देण्याचा विद्रोही स्वर हा भारतीय स्त्री-साहित्यात महत्त्वाचा आहे. पारंपारिक भक्ती साहित्यात परमेश्वराची केवळ स्तुती आढळते, पण जनाबाई त्यांच्या दुःखासाठी आणि उपेक्षेसाठी देवावर संताप व्यक्त करतात. ही त्यांच्या स्त्री मनाची आर्तता असून, यातून तत्कालीन पुरुषसत्ताक आणि जातिभेदावर आधारित व्यवस्थेविरुद्धचा त्यांचा असंतोष नकळत प्रकट होताना दिसतो. विठ्ठलावरचे त्यांचे प्रेम इतके निखळ होते की, जेव्हा तो तिच्या हाकेला ओ देत नाही, तेव्हा त्या विठ्ठलाला थेट शिव्याशाप देतात, भांडतात आणि आपला संताप व्यक्त करतात.

*"अरे विठ्या विठ्या मूळ मायेच्या कारट्या..*
*तुझी रांड रांडकी झाली जन्मसावित्री चुडाल्याली*
*तुझे गेले मढे तुला पाहून काळ रडे*
*उभी राहुनी अंगणी शिव्या देते दासी जनी"*

अशा प्रकारची अद्वितीय अभिव्यक्ती भक्ती परंपरेत फारशी आढळत नाही, परंतु जनाबाई यांनी मात्र पारंपरिक रूढीवादी भक्तीला आव्हान दिल्याचे दिसून येते.. परमेश्वराशी इतके जवळचे आणि प्रामाणिक नाते जोडण्याची

हिंमत केवळ एका आत्मविश्वासी आणि स्वच्छ मनातच येऊ शकते, असे म्हणता येते.

**उपेक्षा आणि अनाथपणाची जाणीव**

नामदेवांच्या कुटुंबात राहत असतानाही जनाबाईंना उपेक्षित जीवन जगावे लागले होते. भरगच्च अशा कुटुंबातील त्या सदस्य असूनही त्यांना एकटेपणाची, परकेपणाची आणि अनाथ असल्याची जाणीव त्यांच्या मनात सतत होती. त्यांच्या अनेक अभंगातून हे दुःख नकळत व्यक्त होताना दिसते. ज्यावेळी त्या अंघोळीला बसतात परंतु त्यांना पाणी देण्यासाठी कोणीही पुढे येत नाही, त्यावेळी त्यांच्या मदतीला देव येतो, त्यावेळी त्या म्हणतात..

*जनी बैसली न्हायाला। पाणी नाही विसणाला।*
*देव धावोनिया आले। शितळ उदक घे घे बोले।*

या अभंगात देव पाणी घेऊन आले ही गोष्ट जितकी महत्त्वाची, तितकेच मोठे एकत्र कुटुंब असूनही जनाबाईला पाणी द्यायला कोणीच येत नाही, हे वास्तव त्यांच्या उपेक्षित जीवनाची साक्ष देते. त्यांच्या काव्यातील ही 'विरंगुळा शोधणारी आर्तता' स्त्री मनाचा गहिवर व्यक्त करते.

**भक्त आणि परमेश्वरातील निखळ नाते**

जनाबाईंचे विठ्ठलासोबतचे नाते केवळ भक्तीचे नसून ते सख्याचे, माय-बापाचे आणि कधीकधी तर भांडणाचेही आहे. विठ्ठल तिच्या सर्व कामात मदत करतो, पण जेव्हा तो धावून येत नाही, तेव्हा जनाबाई आपला संताप, राग शिव्या देऊन व्यक्त करते.

*अरे विठ्या विठ्या मूळ मायेच्या कारट्या...*
*उभी राहुनी अंगणी। शिव्या देते दासी जनी।*

अशाप्रकारे संताप व्यक्त करूनही विठ्ठल त्यांना आपल्या छत्रछायेखालीच ठेवतो. भक्त आणि परमेश्वर यांच्यातील हे निखळ आणि निर्मळ नाते भारतीय भक्ती परंपरेत दुर्मिळ आहे. जनाबाईंनी परमेश्वराला मानवी स्तरावर आणून ठेवले, ज्यामुळे सामान्य लोकांना भक्तीचा मार्ग सुलभ झाला.

**उपसंहार**

संत जनाबाईंचे जीवनचरित्र आणि साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासातील एक तेजस्वी आणि प्रेरणादायक पर्व आहे. त्यांनी आपले जीवन दासी म्हणून व्यतीत केले, पण त्यांच्या अभंगांनी त्यांना वारकरी संप्रदायाच्या शिरपेचातील हिरा बनवले. त्यांचे साहित्य केवळ भक्तीचे गुणगान करत नाही, तर ते तत्कालीन समाजातील दारिद्र्य, जातीय विषमता आणि स्त्री जीवनातील संघर्ष यांवर प्रकाश टाकते. जनाबाईंनी श्रमाधिष्ठित जीवनाला भक्तीचे अधिष्ठान दिले आणि स्त्री जन्माबद्दल उदास न होण्याची प्रेरणा दिली. त्यांचे अभंगविश्व हा वास्तववादी, श्रमाभिमुख आणि समानतावादी आहेत. म्हणूनच, संत जनाबाई या केवळ मराठी साहित्याच्या महत्त्वाच्या घटक नाहीत, तर त्या भारतीय सामाजिक क्रांतीच्या आणि स्त्री-मुक्ती लढ्याच्या एक महत्त्वपूर्ण साक्षीदार आहेत.

**संदर्भ :**

१) शेवडे इंदुमती, संत कवयित्री जनाबाई,पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९८९.
२) भिंगारकर. द. बा., संत कवयित्री जनाबाई: चरित्र काव्य आणि कामगिरी, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई १९८९.
३) जनाबाई, नामदेव गाथा, गीता प्रेस गोरखपूर